# सिद्धिविनायक मेट्रो स्थानक पूर्ण

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानच्या पॅकेज ४ अंतर्गत सिद्धिविनायक मेट्रो स्थानकाचे काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएलने फेसबुकवर व्हिडीओ अपलोड करून दिली आहे. मुंबईकरांना त्यांच्या आवडत्या बाप्पाकडे नियमितपणे नेण्यासाठी मेट्रो स्थानक सज्ज झाल्याची कॅप्शन एमएमआरसीएलने या व्हिडीओला दिली आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गाची लांबी ३३ किमी. असून, दोन्ही बाजूंनी भुयार खणण्याचे काम ९४ टक्के पूर्ण झाल्याची माहिती काही दिवसांपूर्वीच एमएमआरसीएलने दिली होती. या संपूर्ण मार्गिकेचे ७ पॅकेजमध्ये टप्प्याटप्प्याने काम सुरू असून, पॅकेज ४ अंतर्गत सिद्धिविनायक, दादर आणि शीतलादेवी मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. अत्यंत रहदारीचा आणि वाहनांच्या वर्दळीचा विभाग असणाऱ्या या भागात काम करणे अत्यंत आव्हानात्मक असल्याचे एमएमआरसीएलकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सिद्धिविनायक मेट्रो स्थानकामुळे पहिल्यांदाच मंदिर परिसरात मेट्रो कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे. सिद्धिविनायक मेट्रो स्थानकादरम्यान ८१ टक्के प्लॅटफॉर्मचे काम पूर्ण झाले असून, कॉनकर्स स्लॅबचेही १०० टक्के तर रूफ स्लॅबचे काम ८९ टक्के पूर्ण झाले आहे.